# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ E-mail: ronagpur.dte@gmail.com

फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३ Web Site :- www.rdtenagpur.org.in

**कालमर्यादेत**

क्रमांक :- तंशिस/विकाना/ईबीसी/२०१५/ 1384

दिनांक:- 15 MAY 2015

प्रति,

संचालक/प्राचार्य,
खाजगी व कायम विनाअनुदानित संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

**विषय:- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कांच्या ५० टक्के प्रतिपुर्तीबाबत.**

संदर्भ:- संचालनालयाचे पत्र क्रं. १५/तंशिसं/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१४-१५/२३, दि.१४/५/१५

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये मराठा व मुस्लिम ह्या समाजातील प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपुर्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी **(ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर दिनांक १५ मे २०१५ ते २५ मे २०१५ पर्यंत भरण्यासाठी लिंक देण्यांत येत आहे.**

विद्यार्थ्यांनी **दिनांक २५ मे २०१५** पर्यंत संगणकीय प्रणालीवर भरलेल्या अर्जांची प्रत प्रमाणित करुन आवश्यक त्या कागदपत्रासह संस्थेत जमा करण्यांच्या आपल्या स्तरावर सुचना देण्यांत याव्यात. **संस्थेने ऑनलाईन अर्जांची छाननी करून फक्त पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयास दिनांक ३० मे २०१५ पर्यंत जमा करावेत.** या तारखेनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी.

**ज्या विद्यार्थ्यांनी मुस्लिम आरक्षणातंर्गत प्रवेश घेतला आहे व अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा लाभ घेतला आहे अशा विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्यांत येऊ नये. असे केल्यास प्राचार्यांना जबाबदार धरण्यांत येईल याबाबत गंभिर नोंद घ्यावी व त्याबाबतचे प्राचार्यांचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.** (विद्यार्थ्यांनी यापुर्वी कोणत्याही योजनेतून शैक्षणिक शुल्काचे लाभ घेतले नाही असे स्वयं घोषणापत्र सादर करणे अनिवार्य राहील तसेच इतर योजनेमधून लाभ मंजूर झाल्यास या योजनेद्वारे प्राप्त झालेली रक्कम शासन जमा करण्यासंबंधीसुध्दा घोषणापत्रामध्ये नमूद करावे.)

मराठा/मस्लिम आरक्षणामध्ये प्रवेश घेतेलेल्या विद्यार्थ्यांना ५० टक्के प्रतिपुर्तीची ही अंतिम संधी आहे याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यांत यावी.

**सहपत्र:- संदर्भिय पत्र.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहितीकरीता मानार्थ सादर.